# <u>प्रेसनोट</u>

दि.१९/०७/२००९ रोजी हॉटेल अरोरा टॉवर, एम.जी. रोड, कॅम्प, पुणे येथे स.पो.फौ. वाल्मिक बाबुराव जाधव, लष्कर वाहतुक विभाग, पुणे हे त्यांचे कर्तव्य बजावत असताना, इसम नामे- कमल जुगराज जैन, रा.हडपसर, पुणे यांचे फोर्ड कंपनीची आयकॉन कार हि डंबल पार्कींगमध्ये पार्क केली असता, सदर गाडीवर कारवाई करणे करीता, क्रेन वरील क्लिनर मार्फत जामर लावुन, त्याचे शासकिय कर्तव्यपार पाडीत असताना ती वरील चालक नामे- कमल जैन याने अचानकपणे येवुन जाधव यांना शिवीगाळ करुन, वाहन चालु करुन, सपोफौ जाधव यांचे अंगावर घालुन, जिवे मारण्याचा प्रयत्न केला, त्यावेळी फिर्यादी जाधव यांनी स्वतःचा जिव वाचविण्याकरीता, सदर गाडीचे बोनेटवर उडी मारली असताना सुद्धा, चालक जैन याने गाडी न थांबविता, भरधाव वेगाने वाहन चालवुन, नेहरु मेमोरीयल हॉल चौक येथुन, दोराबजी हॉटेल चौक मार्गे, हॉटेल ब्ल्यु नाईल चौक, इस्कॉन मंदिर समोरुन, तिन तोफा चौक येथे तत्कालिन पोलीस उप-आयुक्त श्री.सेनगांवकर साो., यांनी फायरींग करुन सदर चे वाहन तिन तोफा चौक येथे थांबविले. व त्या बोनेटवरील सपोफौ जाधव यांचा जिव वाचविला. दरम्यान सदर वाहन चालकाने दोन वाहन चालकांना अपघात करुन जखमी केले.

दि.२०/१२/२०१७ रोजी अतिरीक्त जिल्हा व सत्र न्यायाधिश श्री.व्ही.के.कदम यांनी सदर आरोपीस वयाचा विचार करुन, त्यास तिन वर्षे सक्त मजुरीची व चार हजार सहाशे रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे. त्याकामी अतिरीक्त सरकारी वकील सौ.शुभांगी देशमुख यांनी काम पाहिले असुन, त्यांना सपोफौ अशोक हुंडेकरी यांनी योग्य ती मदत केली आहे. सदर गुन्ह्यात दहा साक्षीदार तपासले, तसेच श्री.रविंद्र सेंनगावकर, अतिरीक्त पोलीस आयुक्त सो., दक्षिण प्रादेशिक विभाग, पुणे शहर यांची साक्ष महत्वाची ठरलेली आहे. तसेच सदर गुन्ह्याचा तपास श्री.सुहास नाडगौडा, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, बंडगार्डन पोलीस स्टेशन यांनी केलेला असुन, कोर्ट पैरवी म्हणुन श्री. रुपेश टेमगिरे, पोलीस उप-निरीक्षक, बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे यांनी काम पाहिलेले आहे.